मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543

वर्ष ७ वे | अंक :०३ | रविवार २० एप्रिल ते २६ एप्रिल २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४





सौ. रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
मो-९८९०८७९७५७



पान २ संपादकीय तृष्णेचे मोल..

पान ३ सदानंद दाते ...

पान ४ पुस्तके माणसांना...


## दीड तासांचा प्रवास केवळ १५ मिनिटांत, विरार-पालघर 'रो रो' सेवा सुरू; किती प्रवासी प्रवास करू शकणार?

**विरार ते खारवाडेश्री अर्थात सफाळेपर्यंत रो-रो सेवा आजपासून सुरू होत असून यामुळे प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे.**





पालघर : विरार ते खारवाडेश्री (सफाळे) अशा बहुचर्चित रो-रो सेवेचा शुभारंभ आज, शनिवारपासून प्रायोगिक तत्त्वावर करण्यात येणार आहे. महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत मे. सुवर्णदुर्ग शिपिंग अँड मरिन सर्व्हिसेस प्रा. लि. संस्थेद्वारे रोरो फेरीबोट सेवा सुरू करण्यात येणार आहे. ही सेवा सरू होताच सफाळे ते विरारचे अंतर केवळ १५ मिनिटांत गाठता येणार आहे. सध्या हे अंतर पार करायला रस्तेमार्गाने एक ते दीड तासांचा वेळ लागतो, आता समुद्रमार्गाने प्रवासाचा वेळ वाचणार आहे, तसेच इंधनाचीही बचत होणार आहे.वसई, विरार आणि मिरा रोड, भाईंदर शहरांदरम्यान रो-रो सेवा मागील वर्षांत सुरू करण्यात आल्यानंतर, आता दुस-या टप्प्यात विरार ते सफाळे म्हणजेच खारवाडेश्री अशी रो-रो सेवा आजपासून सुरू होत आहे. वसई, विरारकरांना रस्ते मार्गाने सफाळे, पालघर गाठण्यासाठी एक ते दीड तासांचे अंतर पार करावे लागते. अहमदाबाद महामार्गाने पालघरला जाण्यासाठी दीड तासांचा वेळ लागतो. तसेच, वाहतूक कोंडीत अडकल्यास वेळ अधिक लागतो.रस्ते मार्गांबरोबरच रेल्वेने पालघरला जाण्यासाठीही तितकाच वेळ लागतो. त्यात लोकल सेवेची कमतरता असल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. यासाठी वसईप्रमाणे विरार ते पालघरदेखील रो-रो सेवा सुरू करावी यासाठी नागरिकांची मागणी होती. त्यानुसार माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांनी याबाबत वारंवार प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यानंतर आता ही सेवा सुरू होत आहे.विरार ते सफाळे रो-रो सेवेसाठी विरारमधील नारंगी जेट्टी तयार


पान नं. 2


## किरकोळ वाद, चिडलेल्या भावाने सात वर्षांच्या बहिणीला कटरने ठार केलं, वसईमधील घटनेला नवं वळण

**आधी ती चिमुकली स्टुलवरुन पडली आणि मृत पावली असं सांगण्यात आलं होतं.**

**नंतर मात्र १२ वर्षांच्या तिच्या भावाने हत्या केल्याचं कबुल केलं.**

पालघर : वसईमध्ये गुरुवारी घडलेली हत्येची एक हृदयद्रावक घटना (Vasai Minor Girl Death case) आता चक्रावून टाकणाऱ्या वळणावर आली आहे. सात वर्षीय अंजली मिथुन शर्मा या चिमुरडीचा मृत्यू अपघात नसून तिच्या १२ वर्षीय भावानेच हत्या केल्याचे उघडकीस आले आहे. किरकोळ वादातून हा धक्कादायक प्रकार घडल्याची माहिती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश कुराडे यांनी दिली आहे.ही घटना गुरुवारी १७ एप्रिल रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास वसई पूर्व येथील पेल्हार परिसरात घडली. अंजली घरी एकटी होती. तिचे आई-वडील कामानिमित्त घराबाहेर गेले होते, तर तिचा भाऊ बाहेर खेळत होता असे सुरुवातीच्या तपासात सांगण्यात आले होते.आधी अपघात झाल्याचं सांगितलं प्राथमिक माहितीनुसार, अंजलीने किचनमधील ओट्यावर ठेवलेले सामान काढण्यासाठी स्टुलवर चढण्याचा प्रयत्न केला. मात्र स्टुलवरून घसरून ती खाली पडली आणि मानेजवळील भाग किचनच्या पक्कडवर आपटल्यानं गंभीर जखमी झाली. सुरुवातीला ही माहिती पोलिसांना देण्यात आली होती. शेजा-यांनी तात्काळ अंजलीला वसई-विरार महानगरपालिकेच्या तुळिंज रुग्णालयात दाखल


पान नं२


## राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले तर दोघांना किती फायदा होणार? सोप्या शब्दांत समजून घ्या A टू Z 'राजकारण'





महाराष्ट्राच्या राजकारण आता एका नव्या वळणावर जाताना दिसत आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही बंधू आता एकत्र येण्याच्या दिशेला वाटचाल करत आहेत. दोघांची युती झाली तर दोन्ही ठाकरेंना किती फायदा होणार? ते आपण सोप्या शब्दांत समजून घेऊयात.मुंबई : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नुकतंच चित्रपट निर्माते महेश मांजरेकर यांना दिलेल्या मुलाखतीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत युतीच्या विचारलेल्या प्रश्नावर मोठं वक्तव्य केलं. महाराष्ट्राच्या हितासाठी आपण उद्धव ठाकरे यांच्यासोबत युती करण्यास तयार असल्याचं राज ठाकरे म्हणाले. त्यांच्या या वक्तव्याला उद्धव ठाकरे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. आपण राज ठाकरे यांच्यासोबत युती करण्यास तयार आहोत. पण राज ठाकरे यांनी भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत राजकीय मैत्री ठेवू नये, अशी अट उद्धव ठाकरे यांनी ठेवली. याच अटीमुळे शिवसेना यूबीटी पक्ष आणि मनसे पक्षांच्या प्रवक्त्यांमध्ये शाब्दिक चकमक रंगलेली बघायला मिळत आहे.राज ठाकरे यांच्याकडून ठाकरे गटाची अट मान्य झाली तर उद्धव ठाकरेंचा पक्ष युतीसाठी सकारात्मक असणार असल्याचं खुद्द खासदार संजय राऊत यांनी म्हटलं आहे. ही अट ठेवताना संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्यावर खोचक टीका केली. तसेच या नेत्यांसोबत राज ठाकरे यांची डीनर डिप्लोमसी पार पडली. त्यामुळे आपल्यासोबत युती करुन पडद्यामागून महायुतीला छुपा पाठिंबा दिला जाऊ नये, असं उद्धव ठाकरेंच्या पक्षाचं म्हणणं आहे. तर राज ठाकरे यांच्या पक्षाच्या नेत्यांनी देखील त्यावर प्रत्युत्तर दिलं आहे.एकत्र यायचं असेल तर अट न ठेवता एकत्र यावं. राज ठाकरे कमिटमेंट पाळणारे नेते आहेत. त्यामुळे त्याची चिंता करु नये. पण अशी अट ठेवली तर युती होणं शक्य नसल्याचे देखील संकेत मनसे नेत्यांकडून देण्यात आले आहेत. तसेच मनसे नेते संदीप देशपांडे यांनी तर ठाकरे गटाककडून आपल्याला २०१४ आणि २०१९ या दोन्ही वेळेला फसवणूक झाल्याचा आरोप केला. दोन्ही वेळेला युतीची चर्चा होते आणि ऐनवेळी उद्धव ठाकरे यांच्याकडून फोन उचलला जात नाही, अशी टीका संदीप देशपांडे यांनी केली. तर मनसे नेते अमेय खोपकर यांनी 'अशी अभद्र युती होऊ नये', असं म्हटलं आहे. या सर्व घडामोडींच्या पलिकडे आता ठाकरे बंधू खरंच एकत्र आले तर त्यांना कितपत फायदा होईल? याबाबतही आपण विचार करुयात.ठाकरे बंधू एकत्र आल्यास महाराष्ट्राला नवा पर्याय मिळेल राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावं,


पान नं२


## लवकरच सविस्तर बातमी प्रसिध्द केले जाईल...

एका बडया पक्षाच्या पदाधिकारीच्या नावाखाली ऑर्नेट हाईट्स यशवंत स्मार्ट सिटी मधुबन टाऊनशिप वसई पुर्व येथे रहिवाशी कडून पैशाची मागणी ? कोण मागत आहे पैसे कोण करत आहे पैसे वसुल ? लवकरच बातमीद्वारे खुलासा केले जाईल ...

# संपादकीय...!

## तृष्णेचे मोल

गारगाई प्रकल्प हा पालघर जिल्ह्यात होणार असून त्यासाठी आवश्यक असलेल्या वन व पर्यावरणाच्या प्रस्तावांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी मंजुरीची मोहोर उमटविली.टँकरचा संप झाला असता, गगनचुंबी टॉवरनी वेढलेल्या शहराच्याही तोंडचे पाणी कसे पळते, याचा दाहक अनुभव मुंबईने अलीकडेच घेतला. उन्हाचा तलखी वाढू लागली आणि पावसाचे आगमन लांबले, की मुंबईत पाणीकपातीचे संकट घोंघावू लागते. या अशा कालातच गारगाई प्रकल्पाला गती मिळाल्याचे दिलासा देणारे वृत्त मुंबईकरांसाठी आले आहे.गारगाई प्रकल्प हा पालघर जिल्ह्यात होणार असून त्यासाठी आवश्यक असलेल्या वन व पर्यावरणाच्या प्रस्तावांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी मंजुरीची मोहोर उमटविली. गेल्या दीडशे वर्षांत मुंबईला पाणीपुरवठा करण्यासाठी सात जलाशय तयार झाले. ब्रिटिश कालात विहार-तुळशी प्रकल्पांपासून सुरुवात होऊन अगदी अलीकडे २०१२मध्ये मध्य वैतरणा येथे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे धरण बांधण्यात आले. मुंबईत दिवसाला सुमारे ३९०० दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा जलवाहिन्यांद्वारे होतो. तरीही मुंबईची पाण्याची गरज भागत नाही व दिवसाला सुमारे ६०० दशलक्ष लिटर इतकी पाण्याची तूट सध्या मुंबई अनुभवते. ती भरून काढण्याच्या दृष्टीने गारगाई येथील प्रकल्प उपयुक्त ठरेल. मुंबईत पाणीपुरवठा योजनेची घडी अत्यंत शिस्तबद्ध रीतीने बसविण्यात आली आहे. पाणी प्रकल्पांसाठी मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पात एक स्वतंत्र विभागही आहे. इतके असूनही काही परिसर वर्षानुवर्षे तहानलेले असतात. गिरगाव, गिरणगावांत वरच्या मजल्यांवर पाणी चढत नाही.गेल्या दशकभरात मुंबईतील टॉवरची संख्या वाढत चालली आहे आणि यापुढे धारावीसारखे मोठे प्रकल्प येऊ घातले आहेत. लोकांचे राहणीमान सुधारायचे, झोपडीतून सदनिकेत स्थलांतर करायचे, तर पाण्याची गरजही वाढते. तेव्हा एकीकडे मुंबईत मोठमोठे प्रकल्प आणायचा हट्ट धरायचा आणि दुसरीकडे त्यांना रस्ते, पाणी, वीज, गटार या मूलभूत सोयीसुविधांच्या बाबतीत हात आखडता घ्यायचा, असा असमतोल उपयोगाचा नाही. काही वर्षांपूर्वी ४५५ दशलक्ष लिटरचा मध्य वैतरणा प्रकल्प केंद्राच्या परवानग्या न मिळाल्यामुळे ११ वर्षे रखडला होता. त्या कालात आता पाण्याची वेगळी सोय झाली नाही, तर कोणत्याही नव्या बांधकामांना परवानगी देता येणार नाही, असा इशारा तत्कालीन महापालिका आयुक्तांना द्यावा लागला होता.मंत्रालयात किंवा महापालिकेत सत्तेवर कोणताही पक्ष असो; बांधकामांना आवर घालण्याची भूमिका कुणालाच परवडणारी नसते. प्रत्येकाला घर द्यायचे, ही कलकल असेल, तर पाणी आणि मूलभूत सुविधाही द्याव्याच लागणार. त्यामुळेच सभोवतीच्या पर्यावरणाचा ऱ्हास करून प्रकल्प उभारणे, ही अपरिहार्यता ठरते. मात्र त्याविषयीचे भान सर्वांनी बाळगायला हवे. बृहन्मुंबईतील पाणीपुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी राज्य सरकारने नेमलेल्या जल नियोजन तज्ज्ञ समितीच्या डिसेंबर १९९४च्या अहवालात मध्य वैतरणा, काळू, गारगाई, शाई, पिंजाळ या प्रकल्पांचा उल्लेख आहे. राज्यात काँग्रेस-राष्ट्रवादी व मुंबई महापालिकेत याआधीची शिवसेना-भाजप यांची सत्ता असतानाही वृक्षतोड करूनच मध्य वैतरणा प्रकल्प राबविणे क्रमप्राप्त ठरले होते. आताही पायाभूत सुविधा व विकास यातील दरी सांधण्यासाठी गारगाईचा प्रकल्प हाती घेणे अपरिहार्य आहे. विकास आणि निसर्गाच्या मर्यादा यांची सांगड यापुढे घालावी लागेल.केवळ धरण बांधल्यामुळे आपली जबाबदारी संपली, असे म्हणून चालणार नाही. पर्यावरण व लोकांच्या जगण्याशी निगडित काही प्रश्न अत्यंत कळीचे आहेत. वाडा, जव्हार, शहापूर या सर्व भागांच्या ओंजळीतून महामुंबई पाणी पिते, परंतु या परिसरातील आदिवासी जनता मात्र मैलोन् मैल रान तुडवत जाऊन कोरड्या ठाक विहिरीतून थेंब थेंब पाणी शोधते, हे चित्र बदलायला हवे. मुंबईत तीन-चार रुपयांत हजार लिटर या दराने घरोघरी पाणी मिळते. समुद्राचे पाणी गोडे करायचे ठरविल्यास हा खर्च ६०-७० रुपयांच्या पलीकडे जाईल. गारगाई धरणाचा खर्च ३१०० कोटी रुपये आहे, तर तितक्याच क्षमतेच्या मनोरीतील निःक्षारीकरण प्रकल्पाचा खर्च आठ हजार कोटी रुपयांच्या घरांत आहे. त्यामुळे आज तरी पर्यायी उपाय व्यवहार्य नाहीत. परंतु याचा अर्थ पाण्याची उधळपट्टीही करून चालणार नाही.पाणीगळती आणि पाण्यावर फोफावणारे काळे धंदे यावर अंकुश आणावाच लागेल. सांडपाणी पुनर्प्रक्रिया, पर्जन्यजलसंवर्धन, पाणी वाचविण्याच्या वैयक्तिक सवयी हे सर्व अंगवळणी पाडावे लागेल. प्रकल्पासाठी तीन ते चार लाख वृक्षांचा आपण बळी देणार आहोत, तेव्हा त्याच परिसरात पर्यायी वनीकरण कसे करता येईल, हे पाहायला हवे. पावसाळ्यात मुंबई बुडते, रायगड, कोकणातही घरे पाण्याखाली जातात. परंतु, या महापुरांचा उन्हाळ्यातील पाणीटंचाई दूर करायला काहीच लाभ होत नाही. त्यावर काही शास्त्रीय तोडगा हाती येईल का, यात तरुणांची ऊर्जा व कल्पकता कामी आणली, तरच तृषार्ताला पाण्याचे खरे मोल कळले, असे म्हणता येईल.

## राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र... पान नं१

अशी महाराष्ट्रातील बहुसंख्य नागरिकांची भूमिका आहे. राज्यभरातील ग्राउंड लेव्हलवरील बहुसंख्य शिवसैनिकांसह मनसैनिकांची देखील हीच भावना आहे. त्यामुळे दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्यास दोन्ही पक्षांमध्ये एक वेगळं चैतन्य संचारण्याची दाट शक्यता आहे. दोन्ही नेते एकत्र आले तर दोन्ही पक्षांचे कार्यकर्त्यांमध्ये दिलजमाई होईल. त्यामुळे मोठी ताकद निर्माण होईल. विशेष म्हणजे महाराष्ट्राला एक वेगळा पर्याय मिळेल.महाराष्ट्राच्या राजकारण गेल्या साडेतीन वर्षात धक्कादायक घडामोडी घडून आल्या आहेत. शिवसेना पक्षात फूट पडली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली आहे. या राजकीय घाडमोडींमुळे महाराष्ट्राची जनता देखील नाराज आहे. या परिस्थितीत महाराष्ट्राला एक वेगळा पर्याय हवा आहे. दोन्ही बंधू एकत्र आले तर महाराष्ट्राला एक नवा पर्याय मिळेल.दोन्ही ठाकरेंना एकमेकांची गरज, एकत्र आल्यास दोघांना 'असा' फायदासध्याच्या परिस्थितीत दोन्ही ठाकरेंना एकमेकांची गरज आहे, हे वास्तव नाकारता येणार नाही. विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांना अपेक्षित यश मिळालं नाही. तसेच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून 'ऑपरेशन टायगर'च्या माध्यमातून ठाकरे गटाच्या अनेक दिग्गज नेत्यांना आपल्याकडे वळवलं जात आहे. ठाकरेंचे अनेक चांगले शिलेदार त्यांना सोडून गेले आहेत. यामुळे उद्धव ठाकरेंच्या पक्षाची ताकद राज्यभरात कमी झाली आहे.दुसरीकडे राज ठाकरे यांना देखील विधानसभा निवडणुकीत मोठ्या पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. विशेष म्हणजे राज ठाकरे राहत असलेल्या मतदारसंघातच त्यांचे पुत्र अमित ठाकरे हे विधानसभा निवडणुकीत जिंकून येऊ शकले नाहीत. विधानसभा निवडणुकीत राज ठाकरे यांचा एकही आमदार निवडून आला नाही. यामुळे राज ठाकरे यांनादेखील सध्याच्या स्थितीत एका खमक्या राजकीय पक्षाच्या आधाराची गरज आहे.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची मोठी पडझड झाली असली तरी अजूनही हा पक्ष संघटनात्मक दृष्टीकोनातून मजबूत आहे. राज्यातील गावागावात या पक्षाची ताकद अजूनही जिवंत आहे. त्यामुळे दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले तर राज ठाकरेंना उबाठा पक्षाच्या संघटनेचा नक्कीच फायदा होईल. दुसरीकडे राज ठाकरे यांचे समर्थक हे अतिशय निष्ठावंत आहेत. त्यामुळे त्यांचाही ठाकरेंच्या शिवसेनेला फायदा होईल.दोन्ही नेते प्रभावशाली राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही नेते महाराष्ट्राच्या राजकारणात अत्यंत प्रभावशाली नेते आहेत. राज ठाकरे यांनी नुकतंच मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यात केलेल्या भाषणाची अजूनही चर्चा होते. राज ठाकरे यांनी इतकं मुद्देसूद आणि छान भाषण केलं की सर्वच स्तरावर त्यांचं कौतुक होत आहेत. सर्वसामान्यांच्या अगदी मनातील सर्व खदखद ते व्यक्त करत आहेत, असं ते भाषण ऐकल्यावर बहुतांश नागरिकांची अवस्था होती. राज ठाकरे हे स्पष्टवक्ते आहेत. ते ज्यांच्या विरोधात बोलतात त्यांच्या विरोधात सबळ पुरावे देखील सादर करतात. त्यांच्याकडे राज्याच्या भविष्यासाठी एक दृष्टीकोन आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंना राज ठाकरे यांना सोबत घेतलं तर सर्वाधिक फायदाच होईल.दुसरीकडे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची राजकीय मैत्री झाली तर राज ठाकरे यांना उद्धव यांच्या शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचा मोठा पाठिंबा मिळेल. वातावरण राज ठाकरे यांच्या बाजूने होईल. त्यामुळे वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये स्थानिक पातळीवरही मनसे मजबूत होईल. तसेच उद्धव ठाकरे यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून जनतेने पाहिलं आहे. उद्धव ठाकरे यांनी ज्या धैर्याने कोरोना काळात परिस्थिती हाताळली, सर्वसामान्यांना धीर दिला यामुळे त्यांचं खूप कौतुक झालं. उद्धव ठाकरे यांच्या संयमी स्वभावाचे महाराष्ट्राला दर्शन झाले. त्यांच्या या संयमी स्वभावाचा राज ठाकरे यांनाही फायदा होऊ शकतो.मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत दोघांना होणार फायदामुंबई आणि ठाकरे हे समीकरण आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे विरोधात असल्यावर राज ठाकरे तरी आपल्यासोबत असावेत, असा युतीचा प्रयत्न आहे. त्यातूनच काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरेंची भेट घेतल्याची चर्चा आहे. तसेच नुकतंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरेंची देखील भेट घेतली. मुंबईतला मराठी माणूस अजूनही ठाकरेंच्या बाजूला आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेत उद्धव ठाकरेंना घेरायचं असेल तर दुसरे ठाकरे आपल्याकडे असावेत, असा महायुतीचा राजकीय डाव असण्याची शक्यता आहे. पण दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले तर महायुतीसाठी ती मोठी डोकेदुखी ठरु शकते. ते एकत्र आल्यास त्यांना मुंबई महापालिकेत रोखणं हे महायुतीसाठी जड जाण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे दोन्ही भाऊ एक झाले तर त्यांना मुंबई महापालिकेवर विजय मिळवणं सोपं होऊ शकतं. याची जाणीव दोन्ही नेत्यांना झाली असावी. त्यामुळे आता दोन्ही बाजूने युतीसाठी प्रयत्न केले जात असावेत.

## दीड तासांचा प्रवास केवळ...पान नं.१

झाली आहे. तर, सफाळेमधील खारवाडेश्री रो-रो जेट्टी उभारण्यात आली आहे. फेरीबोट सेवेचे तिकीट दर प्रायोगिक तत्त्वावर काही महिन्यांच्या कालावधीसाठी देण्यात येणार आहे. प्रदूषणमुक्त, पर्यावरणस्नेही आणि आरामदायी असा जलवाहतूक सेवेचा पर्याय उपलब्ध होणार असल्याने जनतेसाठी ही सेवा वेळेची बचत करणारी आणि दिलासादायक ठरेल असा विश्वास सागरी मंडळाचा आहे.प्रवास होणार सुलभ

विरार ते पालघर हा जलमार्ग नागरिकांसाठी, तसेच रोज प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांसाठी सोयीचा ठरणार आहे. या जलमार्गामुळे वसई-विरार ते सफाळा-केळवा परिसरात प्रवास करणे सुलभ होणार असून, त्यामुळे पर्यटनाला चालना मिळणार आहे. पालघर हे जिल्ह्याचे मुख्यालय असून, विरार येथून रस्तामार्गे ७० किमीवर असणारे हे अंतर या जलमार्ग सोयीमुळे निम्म्यावर येईल. जलमार्गे हे अंतर केवल तीन किमीवर येणार आहे. त्यामुळे वेळेची बचत होणार आहे.१०० प्रवासी, ३३ वाहने वाहून नेण्याची क्षमता?


महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत वैतरणा खाडीमध्ये विरार ते खारवाडे श्री दरम्यान सध्या प्रायोगिक तत्त्वावर रो-रो प्रवासी फेरीबोट सेवा सुरू होणार आहे. सुवर्णदुर्ग शिपिंग अँड मरिन सर्व्हिसेस प्रा.लि. या कंपनीला ही रो-रो फेरीबोट सेवा चालवण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाकडून परवानगी देण्यात आली आहे. एका फेरीत १०० प्रवासी आणि ३३ वाहने वाहून नेण्याची क्षमता फेरी बोटीची असेल, असा अंदाज आहे

## किरकोळ वाद, चिडलेल्या...पान नं.१

केलं होतं. मात्र, डॉक्टरांनी उपचारापूर्वीच तिला मृत घोषित केलं. यानंतर पोलिसांनी अदखलपात्र मृत्यूची नोंद केली होती. शवविच्छेदनासाठी मृतदेह मुंबईतील जे.जे. रुग्णालयात पाठवण्यात आला होता.भावानेच बहिणीला कटरने मारलेया प्रकरणात शवविच्छेदन अहवाल आणि परिसरातील सीसीटीव्ही फूटेज, तसेच तांत्रिक तपासाच्या आधारावर मिरा-भाईंदर वसई-विरार गुन्हे शाखेने तपासाची दिशा बदलली. पोलिसांनी अंजलीच्या १२वर्षीय भावाची कसून चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. किरकोळ वादातून चिडून त्याने बहिणीला धागा कापण्याच्या कटरने मारल्याचं सांगितलं. या प्रकरणाचा अधिक तपास पोलिस करत आहेत.या प्रकरणी बालकाने गुन्हा केल्यामुळे त्याच्यावर बालन्याय प्रणाली अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. पेल्हार पोलिस ठाणे आणि गुन्हे शाखा विभाग यांच्यातर्फे या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. ही घटना केवल दुर्दैवीच नाही, तर लहान वयात उद्भवणारे तणाव, राग, आणि भावनिक समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज अधोरेखित करणारी आहे.

आता बातमी वेबपोर्टलवर... www.yuvashaktiexpress.in

# सदानंद दाते : मुंबई हल्ल्यात कसाबशी दोन हात ते तहव्वूर राणाच्या यशस्वी प्रत्यार्पणापर्यंतची भूमिका...



२६/११ मुंबई हल्ल्याचा मास्टरमाईंड तहव्वूर राणा आता भारतात नॅशनल इन्व्हेस्टिगेटींग एजेंसीच्या (एनआयए) ताब्यात आहे. योगायोग असा की, राणाच्या चौकशीचं नेतृत्व २६/११ मुंबई हल्ल्यात दहशतवादी कसाबशी लढणारे आयपीएस अधिकारी सदानंद दाते करणार आहेत. सदानंद दाते सध्या एनआयएचे पोलीस महासंचालक (डीजी)आहेत. त्यांच्याच नेतृत्वात राणाचं अमेरिकेतून भारतात प्रत्यार्पण यशस्वी झालं. त्याचा फोटोही एनआयएनं सार्वजनिक केला.२६/११ मुंबई हल्ल्यात कामा रुग्णालयात 'लष्कर-ए-तैयबा'चे दहशतवादी अजमल कसाब आणि अबू इस्माइल यांच्या हल्ल्यात दाते जखमी झाले होते. कसाबने फेकलेल्या ग्रेनेडमुळे दाते यांच्या शरीरावर अनेक जखमाही झाल्या होत्या.

दहशतवाद्यांशी लढल्यामुळे त्यांना प्रेसिडंट्स पोलीस मेडल फॉर गॅलंट्री हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं आहे.कसाबशी दोन हात करणारा हा अधिकारी कोण आहे? चला जाणून घेऊया.कोण आहेत सदानंद दाते? सदानंद वसंत दाते १९९० च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. आयपीएसमध्ये निवड झाल्यानंतर दाते यांची नेमणूक महाराष्ट्र केडरमध्ये करण्यात आली. महाराष्ट्र पोलीस दलात सदानंद दाते यांची ओळख एक शिस्तप्रिय आणि लो-प्रोफाइल अधिकारी म्हणून आहे.सदानंद दाते सध्या एनआयएचे पोलीस महासंचालक आहेत. ३१ मार्च २०२४ ला त्यांनी एनआयएचे पोलीस महासंचालक म्हणून पदभार स्वीकारला. दाते यांनीच तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणातील कायदेशीर लढाईत मोठी भूमिका बजावली.महाराष्ट्रातील पोलीस दलात सदानंद दाते यांना गेल्या ३० वर्षापेक्षा अधिकचा अनुभव आहे. त्यांनी रत्नागिरी जिल्ह्यातून

पोलीस कारकिर्द सुरू केली.पुण्यातील आवाहन, इन्स्टिट्युट ऑफ सायकोलॉजिकल हेल्थने घेतलेल्या मुलाखतीत दाते सांगतात, 'मी चिपळूणमध्ये दारूच्या अड्डयांवर रेड करायला सुरुवात केली. त्यानंतर अवघ्या आठ दिवसात माझी वर्ध्याला बदली करण्यात आली.'त्यानंतर सदानंद दाते यांनी भंडारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक म्हणूनही काम केलं.मुंबईतील क्राइम रिपोर्टर्सची सदानंद दाते यांच्यासोबत पहिली ओळख पोलीस उपायुक्त म्हणून झाली. सदानंद दाते झोन-८ चे डीसीपी होते. त्यानंतर ते मुंबईच्या सेंट्रल रिजनचे अतिरिक्त पोलीस आयुक्त बनले.मुंबईतील वरिष्ठ क्राइम रिपोर्ट सुनिल सिंह यांनी सदानंद दाते यांचं काम जवळून पाहिलंय. बीबीसी मराठीशी बोलताना सुनिल सिंह सांगतात, 'सदानंद दाते यांची महाराष्ट्र पोलीस दलातील कारकिर्द खूप मोठी आहे. मुंबईत अतिरिक्त पोलीस आयुक्त, सहपोलीस आयुक्त गुन्हे, सहपोलीस आयुक्त कायदा-सुव्यवस्था यांसारख्या थेट जनतेशी संबंधित आणि सेन्सेटीव्ह पोझिशन्सवर सदानंद दाते यांनी काम केलं आणि आपल्या कामाची छाप सोडली. सदानंद दाते यांनी मीरा-भाइंदरचे पोलीस आयुक्त म्हणूनही काम केलं आहे.'मुंबई क्राइम ब्रांचचे प्रमुख असताना दाते यांच्या नेतृत्वाखाली क्राइम ब्रांचच्या टीमने रवी पुजारी गँगविरोधात मोहिम सुरू केली होती.मुंबईत महत्त्वाच्या जागी काम करण्यासोबत सदानंद दाते यांनी केंद्रीय पोलीस सेवेतही काम केलंय. केंद्रीय अन्वेषण ब्यूरो म्हणजे सीबीआयमध्ये पोलीस उपमहानिरीक्षक आणि केंद्रीय राखीव पोलीस फोर्समध्ये (सीआरपीएफ) त्यांनी पोलीस महानिरीक्षक म्हणून

महत्त्वाची भूमिका बजावली.सीआरपीएफमध्ये सदानंद दाते यांची पोस्टींग छत्तीसगडमध्ये होती, तर भारतीय गुप्तचर संस्था इंटेलीजेन्स ब्यूरोमध्येही (IB) काम करण्याचा सदानंद दाते यांना अनुभव आहे.एटीएस प्रमुख - सदानंद दाते

महाराष्ट्र नेहमीच दहशतवाद्यांच्या टार्गेटवर राहिला आहे. त्यामुळे महाराष्ट्रच्या दहशतवादविरोधी पथकांचं प्रमुखपद कोणत्याही आयपीएस अधिकाऱ्यासाठी काटेरी मुकुटच म्हणावा लागेल.सदानंद दाते यांनी एटीएचा प्रमुख म्हणून काम केलंय. साल २०२३ मध्ये महाराष्ट्र सरकारने त्यांची एटीएस प्रमुख म्हणून नेमणूक केली. त्यांच्या नेतृत्वात एटीएसने अनेक हायप्रोफाइल केसचा गुंता सोडवला.पाकिस्तानला अत्यंत महत्त्वाची गोपनीय माहिती पुरवल्याप्रकरणी डीआरडीओ पुण्याचा प्रमुख प्रदीप कुरूलकरला सदानंद दाते एटीएस प्रमुख असतानाच अटक करण्यात आली होती.

सदानंद दाते यांनी अमेरिकेतील मिनेसोटा विद्यापीठात फेलोशीप पूर्ण केली आहे. मिनेसोटा विद्यापीठाच्या वेबसाइटवर मिळालेल्या माहितीनुसार, सीबीआयचे पोलीस उपमहानिरीक्षक असताना त्यांनी 'ह्युबर्ट एच. हम्फ्रे स्कूल ऑफ पब्लिक अफेयर्समध्ये अमेरिकेतील व्हाईट कॉलर आणि संघटित गुन्हेगारी नियंत्रित करण्याचे सैद्धांतिक आणि व्यावहारिक पैलू' या विषयावर अभ्यास केला.श्रीपाद काळे मुंबई पोलीस दलातून एसीपी म्हणून रिटायर्ड झालेत. त्यांनी सदानंद दाते यांच्यासोबत मुंबई क्राइम ब्रांचमध्ये काम केलं आहे.श्रीपाद काळे सांगतात, 'कोणत्याही केसवर प्लॅनिंग कसं करायचं, केसमधील बारकावे यांच्याबाबत दाते सरांचा चांगला अभ्यास आहे.'२६/११ मुंबई हल्ला

२६/११ मुंबई हल्ल्यावेळी सदानंद दाते यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली होती. सीएसटी स्टेशनवर फायरिंग केल्यानंतर अजमल कसाब आणि अबू इस्माइल सीएसटी समोरच्या कामा रुग्णालयात शिरले. कामा रुग्णालयात त्यावेळी अनेक रुग्ण उपचार घेत होते. दाते त्यावेळी मुंबईच्या सेंट्रल रिजनचे अतिरिक्त आयुक्त होते.दाते आणि त्यांच्यासोबतच्या टीमने कामा रुग्णालयात कसाब आणि इस्माइलसोबत दोन हात केले. मुंबईच्या दहशतवाद्यांना प्रत्युत्तर देणाऱ्या पहिल्या काही अधिकाऱ्यांमध्ये सदानंद दाते एक होते.मुंबई हल्ला सुरू झाला तेव्हा दाते मलाबार हिल परिसरातील आपल्या घरी होते. हल्ल्याची माहिती मिळताच त्यांनी सीएसटी स्टेशनकडे धाव घेतली.दहशतवादी कामा अल्बेस रुग्णालयात रुग्ण आणि कर्मचाऱ्यांना ओलीस ठेवतील या भीतीने ते कामा रुग्णालयात पोहोचले. त्यावेळी कसाब आणि इस्माइल कामा रुग्णालयात अंधाधुंद गोळीबार करत होते.सदानंत दाते आणि त्यांच्यासोबतच्या कर्मचाऱ्यांनी कसाब आणि इस्माइलला रुग्णालयाच्या एका बिल्डिंगमध्ये कोंडीत पकडलं आणि रुग्णांपर्यंत जाण्यापासून रोखलं.२६/११ च्या हल्ल्यानंतर पत्रकारांशी बोलताना सदानंद दाते म्हणाले होते, 'हा माझ्यासाठी अत्यंत आव्हानात्मक अनुभव होता. मी हा अनुभव कधीच विसरू नाही. मी पोलीस अधिकारी म्हणून माझी भूमिका बजावली आणि माझ्यापरिने जे शक्य होतं ते त्यावेळी करण्याचा प्रयत्न केला.'कसाब आणि इस्माइल कामा रुग्णालयात होते. सदानंद दाते आणि त्यांच्यासोबतच्या अधिकाऱ्यांनी दहशतवाद्यांच्या दिशेने फायरिंग सुरू केली.कसाबने फेकलेल्या ग्रेनेडमध्ये दातेंसोबतचे अधिकारी प्रकाश मोरे यांचा मृत्यू झाला. पण दाते यांनी फायरिंग सुरू ठेवलं.

यात ग्रेनेडच्या शार्पनेलमुळे त्यांना डोळयांच्या बाजूला, छातीवर, हात, पायावर जखम झाली. पण त्यांनी आपली जागा सोडली नाही.

कामा रुग्णालयातील सहाव्या मजल्यावर त्यांनी त्यांच्या टीमने कसाब आणि इस्माइलला जवळपास ४० मिनिटं थांबवून ठेवलं. त्यामुळे अतिरेकी रुग्णालयातील रुग्णांपर्यंत पोहोचू शकले नाहीत.सदानंद दाते यांनी प्रसंगावधान साधत दहशतवाद्यांशी झुंज दिली असं म्हणत २६/११ खटल्यातील न्यायाधीश एम.एल. ताहिलीयानी यांनीदेखील सदानंद दाते यांनी दाखवलेल्या शौर्याचं निकालात कौतुक केलं होतं.२६/११ च्या हल्ल्यात दहशतवाद्यांशी झुंज दिल्याबद्दल त्यांना 'प्रेसिडंट्स पोलीस मेटल फॉर गॅलंट्री' देऊन गौरवण्यात आलं. तर महाराष्ट्र पोलीस दलात उल्लेखनीय सेवेसाठी २००७ मध्ये 'प्रेसिडंट्स पोलीस मेडल फॉर मेरिटोरियस सर्विस' आणि त्यानंतर २०१४ मध्ये 'प्रेसिडंट्स पोलीस मेडल फॉर डिस्टिंग्विश सर्विस' देण्यात आलं.सदानंद दाते यांचं बालपण

सदानंद दाते मुळचे पुण्यातील. त्यांचं बालपण हालाखीच्या परिस्थितीत गेलं. उदरनिर्वाह आणि घराला मदत म्हणून त्यांनी पाचवी ते आयसीडब्ल्यूए पूर्ण होईपर्यंत वर्तमानपत्रं टाकण्याचं काम केलं. सदानंद दाते यांनी पुणे विद्यापीठातून वाणिज्य शाखेतून पदवी मिळवली आणि त्यानंतर डॉक्ट्रेटसुद्धा केलं.सदानंद दाते यांनी त्यांच्या बालपणाबाबत पुण्यातील आवाहन, इन्स्टिट्युट ऑफ सायकोलॉजिकल हेल्थने घेतलेल्या मुलाखतीत अनेक गोष्टी सांगितल्या होत्या. या मुलाखतीत ते म्हणाले होते, 'लहानपणी बरीच स्वप्नं होती, पण पोलीस अधिकारी होण्याचं काही खास स्वप्न नव्हतं.''घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे शिक्षण सुरू असताना काम करणं आवश्यक होतं. त्यामुळे मी कार्यालयात पियून म्हणून, लायब्रेरीत आणि रिसेप्शनिस्ट म्हणूनही काम केलंय.'

आता बातमी वेबपोर्टलवर...
बहुजन महा VIEWS & NEWS
www.bahujanmahaviewsandnews.in




पालघरमध्ये चक्क एका विवाहितेने घरात घुसलेल्या चोरांशी दोन हात केले. विशेष म्हणजे त्यापैकी एकाला मोठ्या धाडसाने पकडून ठेवत पोलिसांच्या ताब्यात दिलेचित्रपटात नायक आणि चोरांमध्ये झटापट होते, हे आपण बऱ्याचदा पाहिले आहे. पण, पालघरमध्ये चक्क एका विवाहितेने घरात घुसलेल्या चोरांशी दोन हात केले. विशेष म्हणजे त्यापैकी एकाला मोठ्या धाडसाने पकडून ठेवत पोलिसांच्या ताब्यात दिले. या झटापटीत ही विवाहिता किरकोळ जखमी झाली असून, दुसरा चोर मात्र दागिने घेऊन पसार झाला आहे. मात्र, या विवाहितेच्या धाडसाचे जिल्हाभरात कौतुक होत आहे.नेमकं काय घडलं? काजल चौहान असे या विवाहितेचे नाव आहे. पालघर नगर परिषद क्षेत्रातील टेंभोडे गावच्या आदर्श नगर वसाहत येथील वसंत विला गृह संकुलात ती कुटुंबासोबत राहते. सोमवारी काजल पतीसह शिरगाव येथे फिरायला गेली होती. तिथून रात्री उशिरा आल्यानंतर काजलचे पती गाडी पार्क करत होते, तर काजल तोपर्यंत घरी आली. त्यावेळी एक व्यक्ती तिला त्यांच्या घरातून बाहेर पडताना दिसली.दरम्यान, वॉशिंग मशिन बिघडली असल्याने सासूबाईंनी टेक्निशियन बोलावला होता. त्यामुळे तो टेकिशियन असावा, असे काजलला प्रथम वाटले. मात्र, त्याच्याकडे विचारपूस केली असता, या पहिल्या चोराने तिला शिवीगाळ करायला सुरुवात केली. तिला हाताने आणि लोखंडाच्या दांडक्याने मारले. मात्र, तिने त्याच्याकडून स्वतःचा बचाव केला.तेवढ्यात त्याने दुसऱ्या चोराला पळण्यास सांगितलं, त्यामुळे त्याने तिथून पोबारा केला. परंतु, काजलने दुसऱ्या चोराला मागून पकडले आणि त्याच्याकडील दागिन्यांची बॅगही पकडली. या अचानक झालेल्या प्रकारामुळे चोर बावरला आणि त्याने बॅग तिथेच टाकून तो पळण्याचा प्रयत्न करू लागला. मात्र, काजलने चोराला सोडले नाही. तेवढ्यात दुसरा चोर नेमका पुन्हा माघारी आला आणि दागिन्यांची बॅग घेऊन पळून गेला.काजलचे पती घरी आले. त्यावेळी त्यांनी या चोराला पकडले. या दरम्यान आजूबाजूचे लोक गोळा झाले. त्यांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर पालघर पोलिस घटनास्थळी दाखल होत, त्यांनी चोराला ताब्यात घेतले. या प्रकरणी पालघर पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे. पकडलेल्या चोराला न्यायालयात हजर केले असता, त्याला पोलिस कोठडी देण्यात आली आहे.



सामाजिक न्याय विभागाचे राज्यप्रमुख मा.श्री.पंडीत कांबळे यांनी राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांची भेट घेऊन विभागीय अहवाल देताना छायाचित्रात दिसत आहे.




# पुस्तके माणसांना समृद्ध करतात...
## - प्राध्यापक एस आर पाटील,

कोरेगाव ता. वाळवा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती ज्येष्ठ माता मालन शंकर गोंधळी यांच्या हस्ते ध्वजारोहण करून साजरी करण्यात आली. त्यानंतर सामुदायिक भीमवंदना करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर बाल चमुच्या लेझीम पथकाने सर्व पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संबंधी माहिती सांगितली. त्यानंतर नवभारत ज्ञानवर्धिनीचे संस्थापक समाजरत्न प्रा. एस. आर. पाटील यांनी या जयंतीनिमित्त बाल वयातच मुलांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा अभ्यास व्हावा म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाची अनेक ग्रंथ तसेच राज्यघटनेची प्रत मुलांच्या अभ्यासासाठी बुद्ध विहार येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचन मंडळामध्ये कायमस्वरूपी ठेवण्यासाठी भेट द्यायची संकल्पना विशद केली. हे ग्रंथ कोरेगावच्या लोकनियुक्त सरपंच प्रा. मानसी पाटील यांच्या हस्ते इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रंथांचे मुलांमध्ये वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून बोलताना सरपंच प्रा. मानसी पाटील यांनी कोरेगावात ' गेली पाच वर्षापासून नवभारत ज्ञानवर्धिनी पुणे संस्था वाचन चळवळीच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे मोठे कार्य करीत आहे. असे प्रतिपादन केले. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त गाव व्यसनमुक्त करण्याची घोषणा विजय कांबळे यांनी केली. बी. के. पाटील सरांनी आपल्या मनोगतातून गावात चालू असलेले विविध सार्वजनिक कार्याची माहिती विशद केली. समाजरत्न प्रा. एस. आर. पाटील यांनी ' वाचन चळवळीचे महत्त्व सांगताना पुस्तकेच माणसांना समृद्ध करतात. सूर्याच्या तेज्यापेक्षा, चंद्राच्या तेज्यापेक्षा, अग्नीच्या तेज्यापेक्षा, मानवी प्रज्ञा अधिक श्रेष्ठ असते आणि म्हणून ही प्रज्ञा विकसित करण्यासाठी तसेच महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे बनण्याचा प्रयत्न म्हणून आजच्या या दिवशी हे ग्रंथ सप्रेम भेट दिले जात आहेत. ही बाब गावाच्या दृष्टीने अभिमानास्पद आहे. तसेच ज्ञानदानाच्या निरंतरपणे चालणाऱ्या कार्यात सर्वांच्या योगदानाचे अपेक्षा व्यक्त करतो. ' असे प्रतिपादन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुभाष गोंधळी, विजय कांबळे, विपुल गोंधळी, तुकाराम कांबळे, चोखा गोंधळी, अरुण गोंधळी, सचिन कांबळे राजेंद्र कांबळे, मंगेश शिंगाडे, प्रमोद लोंढे, विशाल लोंढे व शिवाजी कांबळे यांनी अथक प्रयत्न केले.या कार्यक्रमासाठी कोरेगावचे माजी सरपंच व्यंकट आबा पाटील, माजी उपसरपंच सगरेआण्णा पाटील, माजी उपसरपंच निवास पाटील, ग्रामपंचायत सर्व सदस्य, कोरेगावचे पोलीस पाटील दिलीप गावडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष कारभारी पाटील, गजानन पाटील, संग्राम पाटील, वाहिद मुझावर, सेवानिवृत्त शिक्षक हंबीर आबा पाटील, सुरेश ( तात्या ) पाटील, आनंदराव परीट, विठ्ठल कुंभार, कोरेगावचे प्रगतशील शेतकरी संपतराव पाटील, नारायण दादा पाटील, उदयसिंह पाटील, मोहन मगदूम. ग्रामसेवक सुतार साहेब, महादेव अण्णा ( चौगुले ) पाटील व कोरेगावच्या विविध संस्थांचे व विविध राजकीय पक्षांचे विविध कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन विजय कांबळे यांनी केले.

## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय-
## ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणाऱ्या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ में. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in